# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १४३ वा शनिवार दि.१६ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# जनसेवक रमेशआप्पांना मताधिक्याने विजयी करा

## निवळी येथील महायुतीच्या प्रचार सभेत शंकरआप्पा भिसे यांचे आवाहन

लातूर : – विधान परिषदेचे आमदार या नात्याने रमेशआप्पांनी केलेल्या कामाला राज्यात तोड नाही. मतदार संघाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना सहजतेने भेटणारे जनसेवक आ. रमेशआप्पा कराड यांचा विजय अत्यंत गरजेचा असून येत्या २० तारखेला कमळाच्या चिन्हा समोरील बटन दाबून बहुमताने विजयी करावे असे आवाहन भाजपाचे नेते माजी सनदी अधिकारी शंकराप्पा भिसे यांनी निवळी येथील जाहीर सभेतून बोलताना केले.

लातूर तालुक्यातील मौजे निवळी येथे भाजपा महायुतीच्या प्रचाराची जाहीर सभा गुरुवारी झाली अत्यंत जल्लोषपूर्ण वातावरणात झालेल्या या प्रचार सभेस महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड, भाजपा नेते तत्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय विलासरावजी देशमुख यांचे खाजगी सचिव शंकराप्पा भिसे, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अँड. बळवंतराव जाधव, भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे प्रदीप पाटील खंडापूरकर, युवा नेते ऋषिकेशदादा कराड, फकीरा ब्रिगेडचे प्रा. संजय शिंदे, भाजपाचे तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, सांगायो समिती अध्यक्ष वैभव सापसोड, विजय काळे, विश्वास कावळे, सुरज शिंदे, विनायक मगर, भैरवनाथ पिसाळ, बालाजी गोडसे, नारायण मायंदे, सरपंच अभयकुमार सोनपेठकर, उपसरपंच राजाभाऊ शिंदे, राजाभाऊ शिरसाट, भारत शिंदे, विलास रसाळ, धनराज शिंदे, बिबीशन हिंगले, कान्होबा शिंदे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती सभेला निवळी आणि परिसरातील हजारो मतदार सर्व स्तरातील नागरिक उपस्थित होते.

या सभेत बोरगाव येथील माजी तंटामुक्त अध्यक्ष बापूराव काळे, विलास ढगे, प्रशांत साखरे, रमेश काळे, आलिम सय्यद आणि खंडाळा येथील हमीद शेख, नामदेव कांबळे, नेताजी गरड, नवनाथ भालेकर, अजय गरड, भानुदास पांनढळे, महादेव पानढळे, तुषार करमले यांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

जाहीर सभेत बोलताना महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, निवळी येथील निळकंठेश्वर देवस्थानच्या विकासासाठी आजपर्यंत अनेकवेळा चर्चा झाली मात्र प्रत्यक्षात काहीच केले नाही. राज्यातील महायुती शासनाच्या माध्यमातून या मंदिराच्या विकासासाठी अधिक दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करून दिला निवळीच्या मंदिरासह मतदारसंघातील साडेतीनशेहून अधिक मंदिराचा जिर्णोद्धार करण्याचे भाग्य मला लाभले. मतदार संघातील विविध विकास कामांना कोट्यावधी रुपयाचा निधी मिळवून दिला मी उपकार केले नाही तर तो तुमचा अधिकार होता. असे सांगून ज्यांना तुम्ही निवडून दिले त्या काँग्रेस आमदाराने कुठल्या विकास कामाला निधी दिला काय कामे केली असा प्रश्न उपस्थित करून निष्क्रिय आमदाराला जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे असे बोलून दाखवले.

साखर कारखान्याच्या माध्यमातून आजपर्यंत राजकारण केले मात्र कधीच शेतकऱ्यांचे हित पाहिले नाही प्रत्येक वेळी शेतकऱ्याची अडवणूक आणि पिळवणूकच केली. ज्या शेतकऱ्यांनी आपल्या कष्टातून कामातून घर बांधले असेल, गाडी घेतली असेल, लेकरांची लग्न केली असले तर हे सर्व आमच्यामुळे झाले अशी उपकाराची भाषा केली जाते असे सांगून आ रमेशआप्पा कराड म्हणाले की, लातूर शहर आणि ग्रामीण दोन्ही मतदार संघात परिवर्तनाची मोठी लाट निर्माण झाली आहे. मतदार देशमुख बंधूना धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही तेव्हा आपणही या परिवर्तनाच्या लढाईत सहभागी होऊन भाजपा महायुतीला विजयी करावे कमळाच्या समोरील बटन दाबून आपली सेवा करण्याची मला संधी द्यावी असेही आवाहन त्यांनी केले.

सामाजिक आध्यात्मिक आणि राजकीय क्षेत्रात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या रमेशआप्पा कराड यांनी वारकरी संप्रदाय जोपासण्यासाठी मोठे काम केले. विधान परिषदेचे आमदार असताना आज एवढा मोठा निधी आणू शकले तर उद्या विधानसभेचे आमदार झाल्यास कितीतरी पटीने निधी आणून




विकास कामांना गती दिल्याशिवाय राहणार नाही असे सांगून भाजप नेते शंकरआप्पा भिसे यांनी लातूर ग्रामीण मतदार संघातून रमेशआप्पांचा विजय होणे अत्यंत गरजेचे आहे तेव्हा सर्वांना सहजतेने भेटणारे सर्वांसोबत बसणारे आणि सर्वाधिक वेळ देणारे रमेशआप्पा यांनाच बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

गेल्या निवडणुकीत उद्धव ठाकरें यांनी देशमुख यांच्या सोबत सौदा करून शिवसैनिकाशी बेईमानी केली. या बेईमानीचा बदला घेण्याची आणि देशमुखाची हुकुमशाही आणि घराणेशाही नष्ट करण्याची ही वेळ आली असल्याचे सांगून शिवसेना संपर्कप्रमुख बळवंत जाधव म्हणाले की, १८ – २० तास काम करणारे सामानाच्या हिताची जपणूक करणारे एकनाथ शिंदे यांच्या रूपाने महाराष्ट्राला कर्तबगार मुख्यमंत्री लाभला आहे समाजातील सर्वांना न्याय देता येईल अशा विविध कल्याणकारी योजना त्यांनी सुरु केल्या आहेत राज्यात पुन्हा महायुतीचे शासन सत्तेवर आणण्यासाठी आणि सत्तेतून पैसा आणि पैशातून स्वतः हे देशमुख यांचे सूत्र मोडीत काढण्यासाठी रमेशआप्पा कराड यांनाच बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यावेळी बोलताना म्हणाले की, गेली पंधरा वर्ष या मतदारसंघातून काँग्रेसचा आमदार निवडून आला जेवढी कामे व्हायला हवी होती त्यापैकी दहा टक्के सुद्धा झाली नाही गेल्या पाच वर्षात विद्यमान आमदारांनी केलेली पाच कामे सांगावीत रमेशअप्पानी केलेली पन्नास कामे सांगायला आम्ही तयार आहोत. वीस वर्ष वैयक्तिक लालसे पोटी नव्हे तर तुमच्या हितासाठी आप्पांनी संघर्ष केला. गोपीनाथराव मुंडे आणि विलासराव देशमुख यांच्या विचाराचा वारसा खऱ्या अर्थाने रमेशआप्पा कडून जपला जात आहे. खऱ्या अर्थाने ग्रामीण मतदारसंघाशी रमेशआप्पांची नाळ जुळलेली आहे. उसाच्या प्रश्नासाठी आता कुणालाही घाबरण्याचे कारण नाही आप्पांनी हक्काचा कारखाना काढला आहे लवकरच गाळप सुरू होईल तेव्हा आपल्या सर्वांच्या हितासाठी मतदार संघाच्या विकासासाठी बारा महिने चोवीस तास उपलब्ध असणारे रमेशआप्पा कराड यांना आशीर्वाद देऊन बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

या सभेत माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, प्रा. संजय शिंदे, विक्रमकाका शिंदे, बालाजी गोडसे, सौरभ देशमुख, राज गाडे यांनी मनोगत व्यक्त केले प्रारंभी सुरज शिंदे यांनी निवळी गावात आणि परिसरात आ. रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामाची प्रास्ताविकातून सविस्तर माहिती दिली शेवटी धनराज शिंदे यांनी आभार मानले सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले. या जाहीर सभेला निवळी आणि परिसरातून काशिनाथ ढगे, राजकुमार सुरवसे, पांडुरंग गडदे धनंजय जाधव, वसंत रसाळ, शिवाजी जाधव, रामभाऊ शिरसाट, ज्योतीराम शिंगारे, गुणवंत पांचाळ, बालाजी सगर, नवनाथ माने यांच्यासह हजारो मतदार सर्वसाधारण नागरिक उपस्थित होते.

# जाती धर्मावर नाही तर विकासाच्या मुद्द्यावर मत द्या : क्रीडा मंत्री संजय बनसोडे



जळकोट/ प्रतिनिधी :– गेल्या पाच वर्षात जळकोट तालुक्यात हजारो कोटी रुपयांचा विकास निधी आणून जळकोट तालुक्याचा कायापालट केला या भागातील रस्ते, वीज, पाणी व आरोग्याचे प्रश्न प्राधान्याने सोडवले काम करत असताना जात व पक्ष बाजूला ठेवून सर्वधर्म समभाव याप्रमाणे मी गेली पाच वर्षे काम केले आहे. निवडणुका आले की विरोधक जातीपातीचे राजकारण करत आहेत. मी जाती धर्मावर नाही तर विकासाच्या मुद्द्यावर मत मागतोय असे मत उदगीर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार संजय बनसोडे हे जळकोट तालुक्यातील गावभेट दौरा निमित्त ग्रामस्थांशी संवाद साधताना बोलत होते.

यावेळी माजी आ.गोविंद केद्रे,माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, जिल्हा बँकेचे संचालक भगवान पाटील तळेगावकर, भाजपाचे दिलीप गायकवाड, माजी जि.प. सदस्य रामराव राठोड, जळकोटच्या नगराध्यक्षा प्रभावती कांबळे, व्यंकटराव तेलंग, चंदन पाटील नागरगोजे, धर्मपाल देवशेट्टे, अर्जुन आगलावे, सभापती विठ्ठल चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे जळकोट तालुका अध्यक्ष संग्राम हासुळे पाटील,सत्यवान पांडे, सत्यवान दळवे पाटील,विकास जाधव, श्रीकृष्ण पाटील, बालाजी मालुसरे, सत्यवान चव्हाण,चंदन पाटील, सोमेश्वर सोप्पा,बालाजी केंद्रे,माधव मठदेवरु,विनायक जाधव, ,कार्याध्यक्ष पाशा शेख, संगम टाले, सोमेश्वर सोप्पा, विनायक जाधव, दिपक आंब्रे, आकाश वाघामारे, गजानन दळवे,चंद्रशेखर गव्हाणे, संगम टाले, संजय माने, संतोष पवार, अरविंद नागरगोजे आदी उपस्थित होते.

या मतदार संघाचा आमदार झाल्यानंतर डोंगराळ व दुर्लक्षित असलेल्या जळकोट तालुक्याचा विकास करण्यासाठी मायक्रो प्लॅन तयार करुन मागील पाच वर्षाच्या काळात विविध शासकीय इमारतीसह सर्व जाती धर्माचे सभागृह, विविध महापुरुषांचे पुतळे, रस्ते, वीज, पाणी व आरोग्याच्या सुविधा पुरवून जळकोट तालुक्याचा मागील २५ वर्षाच्या विकासाचा बॅकलॉग आपण भरून काढुन जळकोट तालुक्याचा उदगीरच्या बरोबरीने विकास केला. जळकोट तालुका दुर्लक्षित होता त्यामुळे सर्वात अगोदर या जळकोट तालुक्याला दळणवळणाने सक्षम केले असुन आता भौतिक दृष्ट्या या तालुक्याला सक्षम करण्याचे काम आपण केले असल्याचे मत क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार ना.संजय बनसोडे हे जळकोट तालुक्यातील गावभेट दौरा निमित्त हळदवाढवणा, रावणकोळा, जळकोट, जिरगा, ढोरसांगवी, कुणकी, विराळ, पाटोदा बु. आदी गावात भेटी देवुन गावातील ग्रामस्थांशी संवाद साधला.

पुढे बोलताना ना.संजय बनसोडे यांनी, जळकोट तालुक्यात मिनी एम.आय.डी.सी आपण मंजूर केली आहे. भविष्यात आपल्या तालुक्यातील तरुणांना रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून या ठिकाणी मोठे उद्योग उभारून पुन्हा एकदा जळकोट तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आपण मला या निवडणुकीत आशिर्वाद द्यावेत असे आवाहन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले. गावभेट दौरा करताना ना.संजय बनसोडे यांचा प्रत्येक गावातील महिलांनी औक्षण करून आपल्या लाडक्या भावाच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली.

# मतदारसंघाचा सन्मान आणि स्वाभिमानासाठी एकजुटीने मतदान करा - आ.संभाजीराव पाटील निलंगेकर

देवणी/प्रतिनिधी:सलग १० वर्ष अथक मेहनत घेऊन मतदार संघात विकासाची गंगा वाहती केली आहे.मतदारसंघातील प्रत्येक नागरिक सन्मान व स्वाभिमानाने जगावा असे काम केले आहे.परंतु या स्वाभिमानाला ठेच पोहोचवणारी विचारधारा मतदारसंघात कार्यरत असून आपला स्वाभिमान कायम ठेवण्यासाठी एकजुटीने महायुतीला मतदान करा,असे आवाहन माजीमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.

आ.निलंगेकर यांनी शुक्रवारी जन आशीर्वाद यात्रेदरम्यान देवणी तालुक्यातील ममदापूर, चवणहिप्परगा,धोतरवाडी, आरसनाळ,कुमदाळ,होनाळी, सावरगाव,वागदरी,विजयनगर (गौडगाव),इंद्राळ,अंबेगाव, येणगेवाडी,टाकळी,बोंबळी खु., जवळगा,हिसामनगर व हेळंब येथे बैठका घेतल्या.चवण हिप्परगा व जवळगा येथे त्यांच्या सभा झाल्या.

ठिकठिकाणी उपस्थितांशी संवाद साधताना आ. निलंगेकर म्हणाले की,विकास प्रक्रियेमुळे मतदारसंघातील एकही नागरिक लाभांपासून वंचित राहिला नाही. विविध लोककल्याणकारी योजना प्रत्येकाला मिळत असून त्यामुळे सकारात्मक बदल घडत आहेत.महायुतीच्या वचननाम्यात विधायक घोषणा करण्यात आल्या आहेत,असेही ते म्हणाले.

निलंगा मतदारसंघातील जनतेने भरभरून आशीर्वाद दिल्याने विकासासाठी निधीची कमतरता पडू दिली नाही. भविष्यातही मतदारसंघासाठी पैसा कमी पडणार नाही.ही निवडणूक एका उमेदवारासाठी किंवा पक्षासाठी नाही तर मतदारसंघासह राज्यासाठीही महत्त्वाची आहे.भविष्यातील प्रगतीसाठी ती महत्त्वाची आहे. मतदारसंघाला रसातळाला घेऊन जाणाऱ्या अपप्रवृत्ती पासून सावध रहा,असे आवाहनही त्यांनी केले.



आ.निलंगेकर यांनी सांगितले की,तुमचे मत महिला सन्मान, शेतकरी हित,युवक कल्याण, वृद्धांना आधार,आरोग्य सुविधा, शिक्षण यासाठी महत्त्वाचे आहे. सरकारने वृद्धांना मिळणारा लाभ दीड हजारावरून २१०० करण्याचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी, पिकांना वाढीव हमीभाव असे निर्णय सरकार घेत आहे. त्यासाठी आपल्या आशीर्वादाची गरज आहे.येणाऱ्या २० तारखेस कमळ या चिन्हा समोरील बटन दाबून मला आणि महायुतीला विजयी करा,असे आवाहनही आ.निलंगेकर यांनी केले.

या बैठकांना भाजपा तालुकाध्यक्ष काशिनाथ गरीबे, जिल्हा बँकेचे संचालक भगवानरावपाटीलतळेगावकर, माजी सभापती गोविंद चिलकुरे, देवणी बाजार समितीचे सभापती सदाशिव पाटील,माजी सभापती शंकर पाटील तळेगावकर, जिल्हा उपाध्यक्ष अटल धनुरे, प्रशांत पाटील दवण हिप्परगेकर, माजी सभापती सत्यवान कांबळे,बालाजीराव बिराजदार, माजी जिप सदस्य प्रशांत पाटील,सरपंच राज गुणाले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुधीर पाटील,निलंगा युवा सेना तालुकाप्रमुख प्रभात पाटील, सरपंच दिलीप भंडे,कल्याण हुपळे,शामसुंदर भंडे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

# विद्यमान आमदार नमितातार्इ मुंदडा यांनी केलेल्या विकास कामामुळेच जनतेचा भरभरून प्रतिसाद लोकनेते तथा आमदार पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतमताई मुंडे या दोघी बहिणी नमिताताईच्या विजयासाठी उतरल्या मैदानात

केज/प्रतिनिधी मागील पाच वर्षांमध्ये केज मतदार संघामध्ये विद्यमान आमदार नमिताताई मुंदडा यांनी केलेल्या विकास कामामुळेच केज मतदार संघामध्ये त्यांना भरभरून प्रतिसाद मिळत आहे. विद्यमान आमदार नमिताताई मुंदडा यांच्या विजयासाठी आमदार पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतमताई मुंडे या दोघी बहिणी निवडणुकीच्या मैदानात उतरल्या आहेत. केज मतदार संघातील गावागावा मध्ये जाऊन नमिताताई मुंदडा यांना मतदान करून विजयी करण्याचे आवाहन करत आहेत. नमिताताई मुंदडा यांनी मागील पाच वर्षांमध्ये रस्ते, पाणी सांस्कृतिक सभागृह सह विविध विकास कामे केली आहे त्याचबरोबर मतदार संघातील अनेक तीर्थक्षेत्रांना मोठ्या प्रमाणात निधी देऊन तीर्थक्षेत्रांचा विकास केला आहे. याच विकास कामाच्या जोरावर सध्या होऊ घातलेल्या विधान सभेच्या निवडणुकीत विद्यमान आमदार मुंदडा या मतदान मागत आहेत व त्यांनी केलेल्या विकास कामामुळेच जनता त्यांच्या पाठीमागे उभी आहे व त्यांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे असे चित्र सध्या मतदारसंघांमध्ये निर्माण झाले आहे. पाठीमागील कोविंडच्या काळामध्ये देखील जनतेला नमिताताई मुंदडा सह त्यांच्या कुटुंबाने मोठा आधार देण्याचे काम केले मुंदडा परिवार हा कोविंड सारख्या महामारीत देखील जनतेसाठी अहोरात्र काम करीत होते त्याच कामाची पोचपावती म्हणून आज सर्वसाधारण नागरिक त्यांना निवडून आणण्यासाठी अहोरात्र काम करत आहेत. स्वर्गीय विमलताई मुंदडा यांनी पाठपुरावा करून त्यांच्या



कार्यकाळामध्ये शासकीय रुग्णालयाचे बांधकाम हे लोखंडी येथे केल्यामुळे कोविंडच्या काळात मतदार संघातील रुग्णांना त्याचा फायदा झाला आहे. लोकनेत्या पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतम ताई मुंडे या दोघी बहिणी केज मतदार संघातील ग्रामीण भागात ठीक ठिकाणी गाव भेटी दौरा करत कॉर्नर बैठका घेत आहेत दोघेही बहिणी नमिताताई मुंदडा यांच्या प्रचारात अग्रेसर आहेत त्यामुळे नमिता मुंदडा यांचा विजय निश्चित असल्याची नागरिकातून चर्चा ऐकण्यास मिळत आहे.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# अनाकलनीय नितीश

पाच महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीचा निकाल आला. ‘४०० पार’चा नारा देणारी भाजप अडीचशेचा आकडा गाठू शकली नाही. त्यांना तिसर्यांदा आपले सरकार केंद्रात स्थापन करण्यासाठी आंध्रचे चंद्राबाबू नायडू आणि बिहारचे नितीश कुमार यांच्या पक्षांचा आधार घ्यावा लागला. मोदी ३ सरकारच्या पहिल्या अर्थसंकल्पात या दोन नेत्यांना म्हणजे त्यांच्या राज्यांना खूश ठेवण्याचा प्रयत्न केला गेला. चंद्रबाबू बिझनेस ओळखतात. त्यांना आंध्र प्रदेशची नवीन राजधानी उभारायची असल्यामुळे त्यांनी सत्ता आणि निधी यात कमी वाटेकरू असणार्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा पर्याय स्वीकारला. नितीश यांनीही पलटी मारत पुन्हा भाजपचा अर्थात एनडीएचा हात पकडला. बिहारला विशेष आर्थिक दर्जाची त्यांची दशकभराची मागणी अद्याप पूर्ण झाली नाही. तरी नितीश पुन्हा भाजपसोबत आले. आता तर नितीश एवढे मवाळ झाले आहेत की ते जाहीरपणे भाजपच्या नेतृत्वाचे पाय धरताना दिसत आहेत. त्यांची ही कृती माध्यमांमध्ये चर्चेचा विषय ठरली असून नितीश असे का करत आहेत याचेही आकलन होताना दिसत नाही. नरेंद्र मोदी यांचे तिसरे सरकार नितीश आणि नायडू यांच्या टेकूवर आहे. लोकसभा निवडणुकीचे निकाल हाती आल्यावर मोदी यांच्या विरोधात एकवटलेल्या संपूर्ण विरोधकांच्या इंडिया आघाडीने सरकार स्थापन करता येण्याची शक्यता पडताळून पाहिली होती. ते शक्य नसल्यामुळे ते नितीश किंवा नायडू किंवा दोघांची वाट पाहण्यास थांबायला तयार आहेत. इंडियातील काही घटक पक्षांनी तर मोदी सरकार लवकरच पडेल अशी भाकितेही केली. त्यांच्या दुर्दैवाने त्यांच्या अपेक्षेप्रमाणे अद्याप झाले नसताना नितीश यांनी विरोधकांनाच अस्वस्थ करण्याचा सपाटा लावला. बिहारमध्ये काही दिवसांपूर्वीच चित्रगुप्त मंदिरात आयोजित केलेल्या एका कार्यक्रमाला नितीश यांना आमंत्रित करण्यात आले होते. भारतीय जनता पार्टीचे एक नेते आर. के. सिन्हा यांनी मंदिराच्या जिर्णोद्धारासाठी नितीश यांनी केलेल्या कामाची प्रशंसा काय केली, नितीश हे सिन्हा यांच्या पाया पडण्यासाठी पुढे सरसावले. दरभंगा येथे दुसर्या एम्सच्या उद्घाटनासाठी मोदी बिहारला गेले. त्यावेळीही नितीश यांनी मोदींच्या पाया पडण्याचा प्रयत्न केला; तथापि, पंतप्रधानांनी त्यांना वेळीच रोखले आणि त्यांचा हात धरला. बिहारचे राज्यपाल, दोन-तीन केंद्रीय मंत्री, राज्यातील डझनभर मंत्री या कार्यक्रमाला उपस्थित होते आणि त्या सगळ्यांनी हे पाहिले. नितीश यांनी तेथे ९ मिनिटे भाषण केले आणि त्यात किमान आठ वेळा पंतप्रधानांचे नाव घेतले. उर्वरित सात वेळा त्यांनी पंतप्रधानांचे आभार मानले आणि मोदी हे सगळे ऐकून हसत असल्याचे संबंधित कार्यक्रमाच्या व्हिडिओतही दिसते. हा प्रकार भाजपला अथवा भाजप समर्थक वर्गाला सुखावणारा, भावणारा असेलही; मात्र त्यामुळे विरोधकांच्या विशेषत: नितीश यांच्या बाहेर पडण्याची वाट पाहणार्यांची अस्वस्थता वाढवणारा आहे. वास्तविक गळाभेट घेणे, ज्येष्ठांना वाकून नमस्कार करून त्यांचा आशीर्वाद घेणे ही आपल्याकडे सामान्य बाब आहे. कोणी कोणाच्या पाया पडत असेल तर त्यांच्या चांगल्या संस्कारांची प्रशंसाही होते. पण राजकारणात जसे दिसते तसेच असते का? कोणताही भाव अथवा अपेक्षा नसताना राजकारणात सहसा नमस्कार केला जात नाही असे म्हटले जाते आणि तेही वास्तव आहे. नेत्याविरोधात बंडखोरी करून त्यालाच आपला विठ्ठल म्हणणारे राजकारणीही आपल्याकडे कमी नाहीत. मात्र आपल्या आदराचे सातत्याने जाहीर कार्यक्रमात प्रदर्शन करणार्यांचा साधारण एक पन्नाशी किंवा त्याच्या आतला वयोगट असतो. नितीश त्या वयात बसत नाहीत. त्यांच्या मनात पंतप्रधानांबद्दल आदर असेल ही चांगली बाब आहे. तथापि, आपल्यापेक्षा तुलनेने फार कमी यश मिळालेल्या नेत्याचाही त्यांनी व्यासपीठावर नमस्कार करणे हा चर्चेचा विषय नक्कीच आहे. मोदी यांना जेव्हा पंतप्रधान पदासाठी पहिल्यांदा उमेदवारी जाहीर झाली होती तेव्हा २०१३ मध्ये त्यांच्या विरोधात एकच प्रबळ आवाज उठला होता व तो होता नितीश यांचा. त्यानंतर त्यांनी मोदींनी आपल्या राज्यात प्रचाराला येऊ नये असा फतवाच काढला होता व पुढे राष्ट्रीय लोकशाही आघाडीलाच रामराम केला होता. नंतर ते राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस यांच्यासोबत गेले आणि सरकारमध्येही बसले. आताही लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर ते पुन्हा भाजपला येऊन मिळाले आणि काँग्रेस व राजदला त्यांनी तोंडावर पाडले. हाच प्रकार त्यांनी अगोदरही केला होता. आता कुठे जाणार नाही, आता तेजस्वी यादव यांनाच पुढे न्यायचे आहे, अशा गोष्टी त्यांनी भाषणांतूनही केल्या. तरीही पुन्हा भाजपसोबत आले आणि आता त्यांनी नवा नमस्काराचा कार्यक्रम सुरू केला आहे. संख्याबळाच्या दृष्टिकोनातून बोलायचे झाल्यास आज नितीश यांच्या पक्षाची ताकद भाजपपेक्षा कमी आहे. मात्र, नितीशच राज्याचे मुख्यमंत्री आहेत. त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याची त्यांची ही पद्धत आहे का, अशी चर्चाही झडताना दिसते आहे. बिहारच्या राजकारणाची समज असणार्या तज्ज्ञांच्या मते, व्यक्ती सातत्याने कृतज्ञतेचा अंक सुरू करत असेल, तर त्यामागे शक्यतो दोनच बाबी असतात. एक तर त्याला कशाचे तरी भय असते किंवा आपल्या पदाच्या सुरक्षेसाठी तो असे करत असतो. किंवा वयोमानामुळेही असे प्रकार घडू शकतात. पण तिसरी शक्यता खरी मानता येत नाही, कारण वयाचाच जर विषय असेल, तर सहा महिन्यांपूर्वीचे नितीश वेगळे होते अन् आताचे वेगळे. सहा महिन्यांत एवढा विनम्र भाव जागा होत नाही.

# नागरिकांना मतदारांना शिक्षण,आरोग्य तपासणी,उपचार फ्री करा.बाकी मोफत काहीच नको.

महाराष्ट्रात राज्य विधान सभा निवडणुकीत सर्वच पक्ष बहिणीला,भावाला,शेतकऱ्याला,वीज ग्राहकाला मोफत देण्याचे आमिष दाखवत आहेत.बहिणीला १५०० रुपये,भावाला पदवीधारक १०००० रुपये,डिप्लोमा वाल्यांना८०००रुपये,१२ वी वाल्यांना ६००० रुपये,आता सांगा हे पैसे येणार कुठून?.हे कोणालाच सांगता येत नाही.ज्यांनी ७० हजार कोटीचा भ्रष्टाचार केला,तो ही ताट मानेने सांगतो ज्यांनी अंगणवाडी मुलांचा खाऊ मध्ये चिक्की घोटाला केला.इमारत बांधकाम कामगारांचे मध्यान भोजन,आरोग्य तपासणी आणि उपचार,यात कोटीने घोटाला केला.यांचे काय झाले,सरकारने योजना आणली ती पण लोकांना याचा काहीही फायदा होणार नाही अगोदरचे निराधार महिलांना वृद्धापकाळ योजना याचे पैसे देत नाहीत यात काय देणार हे विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर खुश करायचं आणि मूर्ख बनवून सत्ता घेण्याचे हे षड्यंत्र आहे. निवडणुकी नंतर एकही महीलेला याचा फायदा होणार नाही.महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाचे काय झाले किती लोकांना फायदा होतोय?.अण्णाभाऊ साठे महामंडळाचे काय झाले?. आत्ता नवीनच अनेक योजना कागदावर येत त्याचा किती लोकांना फायदा होणार आहे.तर एकही अल्पसंख्यांक माणसाला फायदा झाला नाही पण आश्वासनाने हिंदू मुस्लिम समाजात प्रचंड चीड निर्माण होणारे वातावरण तयार केले जात आहे. मराठे स्वताला उच्च वर्णीय वर्गीय सुवर्ण हिंदू समजतात.ते तलवार,काठ्या घेऊन संघर्षाला तयारच आहेत.ते तर म्हणतात आम्हाला आरक्षण द्या नाहीतर सर्वांचे आरक्षण बंद करा. शेतमजुराला शेतकऱ्याला बेरोजगारला आज पर्यंत किती फायदा झाला. त्याचा रोखठोक ताळेबंद मांडण्याची एकाही पक्षाच्या नेत्यात हिंमत,धमक नाही

सर्वच पक्षाचे भाऊ लाडकी बहीण माझी या योजने अंतर्गत महिना १५००/- रुपये पेक्षा जास्त २१००,३००० देण्यास तयार झाले आहेत. पण दादानों हे पैसे.देण्यापेक्षा तुम्ही डिजेल,पेट्रोल चे भाव कमी करा. आपोआप सर्व भाव कमी कमी होत जातील. गॅस चे दर कमी करा,विजेचा दर कमी करा,शेतकऱ्यांच्या सोयाबीन,कापसाला योग्य भाव द्या त्याने केलेल्या खर्च आणि मंजूरी निघेल एवढा हमी भाव त्यांना द्या.चांगले रस्ते तयार करा, ट्रॅफिक ची समस्या सोडण्यासाठी योग्य पद्धतीने प्रयत्न करा, टोल नाक्यावरील लूटमार थांबा,किती दिवस वसूली करणार ?.जेणे करून राज्यातील प्रत्येक नागरिकांना पैशाची चणचण लागणार नाही. त्यांच्या कमी पगारात,कमाईत पण तुमची लाडकी बहीण तिचे मूलबाळे,आईवडील सासू सासरे सर्वच सुखी राहतील.

सत्ताधारी दादानों,आणखी एक विनंती करतो.तुमच्या लाडक्या भाचा -भाची ची शाळेची फी पण कमी करता येते का बघाणा. जेणे करून त्याला चांगले उच्च शिक्षण घेता येईल की नुसतंच बोलायचं आणि निघून जायचं?.महाराष्ट्रावर आठ लाख कोटी कर्ज आहे, कॅगने ताशेरे ओढलेत.आणि हे रोज नवनवीन घोषित करून मतदारांना पुड्या सोडता आहेत.यूपी आणि मध्य प्रदेश हे राज्य या असल्या योजनेमुळेच मागे राहिले आहे आता तुम्ही महाराष्ट्राची पण वाट लावत आहात,त्यापेक्षा तुम्ही सरसकट अख्ख्या देशात शिक्षण,आरोग्य तपासणी,उपचार फ्री करा देशाचा विकास होईल. महिलांना दीड हजार एक ठीक होतं पण बारावी पास मुलांना महिना सहा हजार, पदवीधरांना महिना दहा हजार देण्यामागील सरकारचा नेमका उद्देश काय आहे ? आपल्या राज्याची शैक्षणिक स्थिती खराब आहे, मुलांना वेळेवर हक्काची शिष्यवृत्ती मिळत नाही, काही जागी २-२ वर्ष झाले तरीही शिष्यवृत्तीचे पैसे मिळालेले नाहीत. अशा योजनेतून मुलांना थेट पैसे देऊन त्यांची प्रगती होण्याची किती शक्यता आहे ? राज्यातील सरकारी शाळांची आज काय स्थिती आहे ? अनेक शासकीय वसतिगृहांच्या इमारती जीर्ण अवस्थेत आहेत,जेवणाच्या मेसबद्दल तर काही बोलायलाच नको, अनेक जण त्यातूनच गेले आहेत.विद्यार्थ्यांच्या आयुष्यात जर श्वाश्वत बदल घडवायचा असेल तर त्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करा,हॉस्टेल सुविधा सुधरवा,शाळा-कॉलेज इमारती सक्षम करा,शिक्षणाचा दर्जा वाढवा.करोडो रुपये यात घालण्यापेक्षा १००० जिल्हा परिषद शाळा बांधकाम नव्याने केले तर जमणार नाही का ? शिक्षकांना वेळेवर पगार होत नाहीत,अंगणवाडी सेविका आंदोलन-उपोषण करत असतात.पदवीधरांना पैसे देण्यापेक्षा त्यांना नोकऱ्या द्या,त्या मिळालेल्या नोकरीतून ते कराच्या रूपात जातील. तसेच त्यांची लग्ने ही होतील. त्यांचे उत्पनाचे सोर्स शाश्वत करण्यावर शासनाचा भर असायला हवा. त्यांना मिळालेल्या उत्पनातून सरकारचा महसूल वाढेल.जी एस टी,कर नेहमी रेवडी-रेवडी म्हणून ओरडायचे,त्यांच्या डोळ्यांना आता हे दिसत नाही का ?.

ज्यांनी आपल्या पक्षाशी स्वतःच्या स्वार्थासाठी विश्वासघात केला अशा लोकांवर जनता तरी काय म्हणून विश्वास ठेवेल ? जनता तेच करणार आहे जे त्यांनी ठरवलंय आणि जनतेने काय ठरवलंय याची चुणूक तुम्हाला लोकसभेत जनतेने दाखवली आहे. सर्वच पक्षाच्या नेत्याचा असा समज (गैर) झालाय की शेवटच्या दोन महिन्यात अशा पद्धतीने पैसे वाटून लोकांची मते विकत घेऊन आपण पुन्हा एकदा मुख्यमंत्री,मंत्री होऊ, असं जर त्यांना वाटतं असेल तर तो त्यांचा फार मोठा भ्रम आहे. मतदार बंधु भगिनिनो सावध व्हा पुढील भविष्य उघड्या डोळ्याने पहा काय होईल ते सांगता येत नाही आज एकमेका विरोधात भांडणारे कदाचित एकत्र येऊन सरकार बनवतील. तेव्हा तुमची मोठी फसवणूक झाल्या शिवाय राहणार नाही. म्हणूनच मतदान आपल्या विचारांच्या पक्षाच्या उमेदवाराला करा.काही ही झाले तर तो तुमच्या सोबत असेल आणि तुम्ही त्यांच्या सोबत असाल. जन आंदोलन करायला?.मोफत देण्याचे आश्वासन देणाऱ्यांना मत दान करू नका.शिक्षण,आरोग्य तपासणी,उपचार फ्री देणाऱ्यांना मतदान करा.शेवटी निर्णय तुमचं आहे. २० नोव्हेंबर ला सकाळी ७ ते ६ वाजे पर्यन्त तुम्ही मतदार राजे आहात आणि २० नोव्हेंबर संध्याकाळी ६ नंतर तुम्ही त्यांच्या समोर भिकारी असाल?.हे ही कायम लक्षात ठेऊन मतदान करा.

*******

सागर रामभाऊ तायडे
९९२०४०३८५९,

# प्रदूषणविरोधी कृती कधी?

प्रदूषण हा नेहमीच चर्चेचा विषय असतो. त्याबाबत गंभीर चिंताही व्यक्त केली जाते. अनेक अहवालही प्रसिद्ध होत असतात. उपाययोजना सांगितल्या जातात. कृती मात्र शून्य. त्यामुळे सध्या प्रदूषणविरोधी कृती गरजेची आहे.

वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन (डब्ल्यूएचओ)च्या सर्वेक्षणानुसार, दिल्लीतील हवेची गुणवत्ता जगभरातील १६०० शहरांमध्ये सर्वात वाईट आहे. तर हवेतील प्रदूषणामुळे नागरिकांचे बळी पडणारे दिल्ली हे ५व्या क्रमांकाचे शहर बनले आहे. जवळपास २.२ दशलक्ष लहान मुलांना या प्रदूषणामुळे फुफ्फुसाचे विकार झाल्याचे निदर्शनास आले आहे. यावरून केवळ दिल्लीकरांच्याच नव्हे तर संपूर्ण भारतातल्या मोठ्या शहरांमधील या समस्येचे भयाण रूप समोर येईल.

वायूप्रदूषणाची पातळी (एअर क्वालिटी इंडेक्स) हे सरकारी एजन्सींनी विकसित केलेले एक सूचक आहे. ही पातळी जगातल्या अनेक शहरांमध्ये धोकादायकरित्या उच्च आहे. अद्ययावत अंदाजानुसार, बाहेरील वातावरण आणि घरगुती वायूप्रदूषणामुळे दरवर्षी ७ दशलक्ष लोकांचा मृत्यू होतो. डब्ल्यूएचओकडील नवीन डेटा दर्शवितो की, १० पैकी ९ लोक उच्च पातळीतील प्रदूषक असलेल्या हवेत श्वास घेतात. दिल्लीतील हवेची गुणवत्ता सर्वात वाईट आहे.



वातावरणात सल्फर डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड, नायट्रस ऑक्साइड, अमोनिया, क्लोरोफ्लोरोकार्बन्स आणि मिथेन यासारख्या दूषित प्रदूषकांचा समावेश असतो. वायू प्रदूषण ही एक गंभीर पर्यावरणीय चिंता आहे. हवेच्या खराब गुणवत्तेचे मानवी आरोग्यावर होणारे परिणाम फार भयावह आहेत. प्रामुख्याने हृदयविकार, श्वसन संक्रमण, फुफ्फुसाचा कर्करोग आणि स्ट्रोक यासह विविध प्रदूषण-संबंधित रोगांसाठी, वायू प्रदूषण हा एक प्रमुख जोखीम घटक म्हणून ओळखला जातो. अशा घातक आजारांमध्ये अनेकांचा मृत्यू देखील होतो. त्यामुळे वायूप्रदूषण रोखणे अत्यंत गरजेचे आहे. वायूप्रदूषणाचा पिके आणि प्राण्यांच्याही जीवनावर विपरीत परिणाम होतो.

२०व्या शतकात वाहतूक सम आणि विषम नियम या संकल्पनेला जगभरातील विविध शहरांमधल्या वाढत्या वायूप्रदूषणामुळे आणि वाहतूककोंडीमुळे प्रतिसाद मिळाला. हवेच्या गुणवत्तेच्या गंभीर समस्यांना प्रतिसाद म्हणून १९८९मध्ये मेक्सिको सिटीमध्ये या उपक्रमाची पहिली अंमलबजावणी झाली. या नियमांनुसार वाहनांच्या नंबर प्लेटचा शेवटचा अंक विषम किंवा सम याच्या आधारावर एकाच दिवशी वाहनांचा वापर प्रतिबंधित केला गेला, ज्यामुळे वाहनांना केवळ नियुक्त दिवसांवरच चालता येते. कालांतराने जगभरातील बर्याच शहरांमधून हा प्रयोग करण्यात आला. त्यानुसार दिल्ली सरकारने शहरातील वायूप्रदूषणाच्या परिणामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पावले उचलली.

दिल्लीमधील वाढत्या प्रदूषणाच्या सुटकेसाठी जानेवारी २०१६ पासून सुरू करण्यात आलेल्या सम-विषम नियमांचा काही प्रमाणात फायदा झाल्याचे नमूद केले गेले. त्यामुळे दिल्ली सरकारने आजवर तीनवेळा या योजनेचा कालावधी वाढवत आणला आहे. त्याचबरोबर इतरही परिणामकारक योजना सुरू केल्या आहेत. त्यातील पहिल्या टप्प्यातील एक उपाय म्हणजे हवेतील घनदाट जड कणांचा बंदोबस्त करण्यासाठी पाण्याचे स्प्रिंकलर वापरण्यात आले, वाहून जाणारे कण नियंत्रित करण्यासाठी रस्त्यांची व्हॅक्यूम साफसफाई सुरू करण्यात आली.

दुसर्या टप्प्यात रुग्णालये आणि ईआर वॉर्ड वगळता संपूर्ण शहरात डीझेल जनरेटरवर १० दिवसांसाठी बंदी घालण्यात आली होती. याशिवाय बांधकाम व पाडावाची कामे तात्पुरती स्थगित केली गेली. कोळसा जाळल्यामुळे आणि फ्लाय अ‍ॅशमुळे होणारे प्रदूषण रोखणे, यासारखे इतरही उपाय योजले गेले होते. या उपायांद्वारे सम-विषम योजनेत पीएम२.५ मध्ये सरासरी १३ टक्के घट झाल्याचे आढळून आले. आयआयएममधील निरिक्षणानुसार २०१६ मध्ये योजनेच्या पहिल्या टप्प्यात दिल्लीतील प्रदूषणात २ ते ३ टक्क्यांनी घट दर्शविली होती, दुसर्या टप्प्यात दिल्ली मेट्रोच्या प्रवासी संख्येत ३ टक्के वाढ झाल्याने प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्याच्या दृष्टीने फायदा झाल्याचे दिसून आले.

वातावरण प्रदूषणाचा महाराष्ट्रातील प्रमुख शहरांच्या बाबतीत विचार केला, तर इथलीही भयावह स्थिती लक्षात येईल. राजधानी मुंबई, पुणे आणि नागपूरसारख्या मेट्रो सिटी आणि इतरही अनेक विकसित शहरातील वाहतुकीच्या इतर समस्यांबरोबरच, वातावरणातील प्रदूषणाचा विषयही गंभीर होत चालला आहे. पुणे आणि चंद्रपूर ही महाराष्ट्रातील वातावरण प्रदूषणाच्याबाबतीत अग्रेसर शहरे आहेत. महाराष्ट्रातील या काही शहरांची हवा प्रदूषणात धोकादायक पातळीवर जाऊ लागली आहे. दिल्ली हे भारतातील सर्वात प्रदूषित शहर असून त्याखालोखाल इतरही शहरे प्रदूषित आहेत.

मुंबईचा सरासरी -एक्यूआय (-एअर क्वालिटी इंडेक्स) ३०९ होता, तर दिल्ली (१९१), पुणे (२७६) आणि अहमदाबाद (२९७) ने तुलनेने कमी -एक्यूआय दाखवला. वायव्येकडून वारंवार येणार्या धुळीच्या वादळांमुळे मुंबईकरांच्या श्वासोच्छ्वासाच्या हवेची गुणवत्ता दिल्ली, अहमदाबाद आणि पुण्यापेक्षाही अत्यंत खराब श्रेणीत गेली आहे. वाहतुकीची सम-विषम नियमावलीच नव्हे, तर देशाच्या राजधानीसारखे इतरही नियम इथे लागू करणे अपरिहार्य ठरेल. त्यामुळे प्रदूषण लक्षात घेऊन शहरांमध्ये सुरू असलेली बांधकामे, उड्डाणपूल आणि मेट्रो प्रकल्पांच्या ठिकाणी धोकादायक धूलिकण रोखणे आवश्यक आहे. त्यानुसार राज्य पर्यावरण आणि वातावरण बदल विभागाने मार्गदर्शक सूचना जारी करणे गरजेचे आहे.

सध्या सुरू असलेली बांधकामे, पाडण्यात येत असलेली बांधकामे आणि इतर प्रकल्पांच्या कामावर ओले हिरवे कापड, ओले ज्यूट कापड अथवा ताडपत्रीने झाकणे बंधनकारक करणे, बांधकामावरील कामगारांना मास्क; गॉगल बंधनकारक करणे, बांधकामाच्या ठिकाणी माती; खडी; वाळू झाकून ठेवणे, उड्डाणपुलांसारख्या सर्व कामांच्या ठिकाणी किमान २० फूट बॅरिकेडिंगउभे करणे, सार्वजनिक ठिकाणी राडारोडा टाकल्यास वाहने जप्तीची कारवाई करणे या सर्व बाबतीत कडक धोरण अवलंबणे आवश्यक आहे. शिवाय प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे (आरटीओ) नोंदणी झाल्यापासून जी व्यावसायिक वाहने १५ वर्षे होऊनही अजून रस्त्यावर आहेत ती बंद करण्याच्या दृष्टीने सरकारने योजना राबविणे आवश्यक आहे. बरीच व्यावसायिक वाहने त्यांच्या फिटनेस सर्टिफिकेटचे नूतनीकरण न करता रस्त्यांवरून धावत आहेत, त्यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे. बंदी असतानासुद्धा शहरात ठिकठिकाणी कचरा पेट्या, गाड्यांचे टायर जाळण्याचे प्रकार घडताना दिसतात, महानगरपालिकांचा त्यावर अंकुश असणे आवश्यक आहे.

लाकूड, कोळसा या सारख्या इंधनांचा वापर कमी करून हवेचे प्रदूषण मर्यादित ठेवावे लागेल. वायूप्रदूषणाला प्रतिबंध करण्याचा एक मार्ग म्हणजे कमी प्रदूषणकारी स्वच्छ ऊर्जा स्त्रोत जसे की पवनचक्की, सौर ऊर्जा, नूतनीकरणक्षम इंधनांकडे वळणे. गॅसोलीन इंजिनऐवजी इलेक्ट्रिक, सीएनजी कारचा वापर केल्यास प्रदूषण कमी होईल. पिकांचे अवशेष जाळायला पर्याय उपलब्ध करून देणे हे इतर महत्त्वाचे उपाय अंमलात आणून वातावरण प्रदूषणावर आपण बर्याचअंशी मात करू शकू. अन्यथा, वातावरणातील प्रदूषणाचा भस्मासूर शहरवासीयांचे आरोग्य आणि जीव याबाबतीत रौद्र रूप धारण केल्याशिवाय राहणार नाही.

# वजन कमी करण्याचा विचार करताय? मग सकाळच्या नाश्त्याला अवघ्या १० मिनिटांत बनवा टेस्टी अंडा फ्राय





अंडी आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानली जातात. बऱ्याचदा वजन कमी करायचे असले की लोक आपल्या डाएट रुटीनमध्ये अंड्याचा समावेश करतात. यात व्हिटॅमिन्स, फॉस्फोरस, सेलेनियम, कॅल्शियम, झिंक, हेल्दी फॅटसह अनेक पोषक घटक आढळली जातात. यात ओमेगा ३ फॅटी सिड असतात, जे ह्दयासाठी फायदेशीर असतात. यामुळेच आठवड्यातून एकदा-दोनदा तरी आपण अंड्याचे सेवन करायला हवे. अंड्याचे हे सेवन आपल्या आरोग्यासाठी चांगलेच फायद्याचे ठरू शकते.

आता अंडी म्हटली की तेच तेच भुर्जी आणि ऑम्लेट असे अंड्याचे पदार्थ आठवू लागतात मात्र आम्ही तुम्हाला सांगतो की, तुम्ही अंड्यापासून एक हटके आणि स्वादिष्ट असा पदार्थ तयार करू शकता. या पदार्थाचे नाव आहे अंडा फ्राय. याच्या नावावरूनच तुम्हाला या पदार्थाचा अंदाज आला असावा. हा पदार्थ सकाळच्या नाश्त्यासाठी एक उत्तम पर्याय आहे. शिवाय, यासाठी फार कमी साहित्याची आणि कमी वेळेची गरज भासते, ज्यामुळे सकाळच्या घाईगडबडीत तुम्ही हा पदार्थ अगदी सहज बनवू शकता. याची रेसिपी सोशल मीडियावर शेअर करण्यात आली आहे, जी आपण आज या लेखातून जाणून घेणार आहोत. चला तर मग अजिबात वेळ न दवडता यासाठी लागणारे साहित्य आणि कृती नोट करा.

रेसिपीच्या बातम्या वाचण्यासाठी इथे क्लिक करा

साहित्य

पाच अंडी
धणे
काळीमिरी
लाल मिरची
कडीपत्ता
बटर
हळद
मसाला
मीठ
कोथिंबीर

रेसिपीच्या बातम्या वाचण्यासाठी इथे क्लिक करा

कृती

अंडा फ्राय तयार करण्यासाठी सर्वप्रथम अंडी उकडून घ्या. यासाठी तुम्ही अंड्यांना कुकरमध्ये टाकून ३-४ शिट्ट्या घेऊ शकता

आता उकडलेली अंडी सोला आणि चाकूच्या मदतीने याचे पातळ काप करा

यानंतर गॅसवर एक पॅन ठेवा आणि यात तेल टाका

मग यात धणे, काळीमिरी, मिरी, लाल मिरची, कडीपत्ता भाजून घ्या

भाजलेले हे साहित्य मिक्सरच्या भांड्यात टाका आणि याची पावडर तयार करा

आता पॅनमध्ये बटर घाला

नंतर यात अंड्याचे काप टाका आणि हलके परतून घ्या

मग यात तयार पावडर, हळद, मसाला, मीठ घाला आणि अंड्यामध्ये मिक्स करा

दोन्ही बाजूंनी अंडी छान मंद आचेवर शिजवून घ्या

शेवटी यावर चिरलेली कोथिंबीर टाका आणि गॅस बंद करा

## लिव्हरला मिळवून देतील मजबूती ५ वनस्पती, आयुर्वेदातील अश्वगंधा पळवून लावेल आजार

यकृत हा आपल्या शरीराचा एक महत्त्वाचा अवयव आहे, जो शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यात आणि पचनक्रिया उत्तम राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. यकृत निरोगी ठेवण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित अनेक आजार बरे करण्यासाठी काही औषधी वनस्पती प्रभावी मानल्या जातात, ज्याच्या मदतीने अनेक आजार दूर ठेवता येतात. आयुर्वेदात अशा काही वनस्पती आहेत ज्या लिव्हरचे आरोग्य निरोगी राखण्यास मदत करतात.

अनहेल्दी लिव्हरमुळे भूक न लागणे, निद्रानाश, थकवा जाणवणे, अशक्तपणा, वजन झपाट्याने कमी होणे, उलट्या होणे आणि यकृताला सूज येणे अशा अनेक समस्या उद्भवू शकतात. आयुर्वेदात यकृताच्या काळजीसाठी अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती सांगितल्या आहेत. परमीत कौर, प्रमुख आणि मुख्य, पोषणतज्ज्ञ आणि आहारतज्ज्ञ, मोरिंगो एशिया हॉस्पिटल, गुरुग्राम यांच्या मते, यकृत निरोगी ठेवण्यासाठी आणि त्याचे नुकसान नियंत्रित करण्यासाठी अनेक औषधे उपलब्ध आहेत, परंतु काही प्रभावी औषधी वनस्पतींच्या मदतीने तुम्ही यकृताची काळजी घेऊ शकता. अनेक समस्यांपासून तुम्हाला आराम मिळू शकतो आणि यामुळे लिव्हर निरोगी राहते

अश्वगंधा वनस्पतीचा उपयोग अश्वगंधा ही आयुर्वेदिक औषधी वनस्पतींपैकी एक आहे. अश्वगंधाचा वापर शारीरिक शक्ती वाढवण्यास, तणाव कमी करण्यास आणि यकृत निरोगी ठेवण्यास मदत करतो. यात दाहक-विरोधी आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म आहेत, जे यकृताला मुक्त रॅडिकल्सच्या चार्जपासून संरक्षण देतात. अश्वगंधा पावडर कोमट पाणी किंवा दुधासोबत सेवन करता येते.



कोरफड

कोरफड ही लोकप्रिय औषधी वनस्पती अँटिऑक्सिडंट आणि दाहक-विरोधी गुणधर्मांनी समृद्ध आहे. याचे जेल अनेक प्रकारच्या आरोग्य समस्यांवर उपचार करण्यासाठी वापरले जाते. हे यकृताचे कार्य सुधारण्यास आणि डिटॉक्सिफाय करण्यास मदत करते. यासाठी दररोज सकाळी रिकाम्या पोटी अर्धा चमचा कोरफडीचा रस एका ग्लास पाण्यात मिसळून पिणे फायदेशीर ठरू शकते. शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून टाकण्यास याचा अधिक उपयोग होतो

गुळवेलाचा फायदा

गुळवेलाला आयुर्वेदात अमृत असेही म्हणतात. यात इम्युनोमोड्युलेटरी गुणधर्म आहेत, जे लिव्हरला अनेक संक्रमणांपासून वाचवण्यास मदत करतात. गुळवेलाच्या नियमित सेवनाने यकृत दीर्घकाळ निरोगी राहते. गुळवेलाचा रस किंवा त्याचा काढा तुम्ही सेवन करू शकता. काढा बनवण्यासाठी गुळवेलाच्या वनस्पतीचे देठ एका ग्लास पाण्यात उकळून सकाळी रिकाम्या पोटी सेवन करा याचा तुम्हाला चांगला परिणाम दिसून येईल

रामबाण ठरणारी हळद

प्रत्येक घरात आढळणारा हा एक सामान्य मसाला आहे, ज्यामध्ये कर्क्यूमिन नावाचे सक्रिय संयुग असते, जे प्रक्षोभक आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्मांनी समृद्ध असते. हळदीमध्ये असलेले कर्क्यूमिन यकृताची जळजळ दूर करण्यास आणि मुक्त रॅडिकल्सच्या प्रभावापासून संरक्षण करण्यास मदत करते. याच्या मदतीने यकृताला अनेक प्रकारच्या नुकसानीपासून वाचवता येते. दुधासोबत हळदीचे सेवन करणे सर्वात फायदेशीर आहे. चांगल्या परिणामांसाठी, एक ग्लास कोमट दुधात अर्धा चमचा हळद मिसळा आणि रात्री झोपण्यापूर्वी प्या.

## बद्धकोष्ठतेपासून सुटका मिळवण्यासाठी करून पहा 'हे' घरगुती उपाय, कधीच उद्भवणार नाही पचनासंबंधित त्रास

दैनंदिन आहारात बदल झाल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवण्यास सुरुवात होते. त्यात प्रामुख्याने जाणवणारी समस्या म्हणजे बद्धकोष्ठता. बद्धकोष्ठतेची समस्या उद्भवू लागल्यानंतर अनेक समस्यांनाचा सामना करावा लागतो. सकाळी उठल्यानंतर टॉयलेटमध्ये जास्त वेळ घालवणे, सतत असिडिटी किंवा अपचनाची समस्या उद्भवणे इत्यादी अनेक लक्षणे जाणवू लागतात. चुकीची जीवनशैली, खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये होणारे बदल, अपुरी झोप, सतत जंक फूडचे सेवन इत्यादी गोष्टींमुळे आरोग्य बिघडण्यास सुरुवात होते. शरीरात पाण्याची कमतरता निर्माण झाल्यानंतर सुद्धा बद्धकोष्ठतेची समस्या उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे डॉक्टरांच्या गोळ्या औषध खाण्यापेक्षा घरगुती उपाय करून आराम मिळवावा. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून आराम मिळवण्यासाठी घरगुती उपाय सांगणार आहोत. हे उपाय केल्यास बद्धकोष्ठतेपासून लवकर सुटका मिळेल. बद्धकोष्ठतेपासून सुटका मिळवण्यासाठी घरगुती उपाय: बद्धकोष्ठतेपासून सुटका मिळवण्यासाठी सकाळी उठल्यानंतर रिकाम्या पोटी कोमट पाण्याचे सेवन करावे. कोमट पाणी प्यायल्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडून जाण्यास मदत होते. रिकाम्या पोटी कोमट पाण्याचे सेवन केल्यामुळे पोटातील स्नायूंना आराम मिळतो. तसेच पचनसंस्था निरोगी राहण्यास मदत होते. शरीरात साचून राहिलेले विषारी पदार्थ बाहेर पडून गेले नाहीतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. त्यामुळे सकाळी उठल्यानंतर कोमट पाण्याचे सेवन करावे.

कोमट पाणी प्यायल्यामुळे आतड्यांमध्ये असलेले अन्न मऊ होते आणि आतड्यांची हालचाल सुलभ होण्यास मदत होते.

## २० रुपयांचे आवळे आणून घरी सोप्या पद्धतीमध्ये बनवा आवळा चूर्ण, पचनासंबंधित समस्या होतील दूर

पचनक्रिया निरोगी ठेवण्यासाठी अनेक लोक कोमट पाण्यात आवळा पावडर मिक्स करून पितात. आवळा खाणे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहे. नियमित आवळा खाल्यामुळे त्वचा आणि केसांना अनेक फायदे होतात. कच्च्या आवळ्यापासून अनेक पदार्थ बनवले जातात. मुरांबा, आवळ्याचं लोणचं, आवळा सुपारी, आवळा कॅण्डी इत्यादी अनेक पदार्थ बनवले जातात. आयुर्वेदामध्ये सुद्धा आवळा पावडर खाण्यास विशेष महत्व आहे. बिघडलेली पचनक्रिया सुधारण्यासाठी आवळा पावडर किंवा आवळा चूर्णाचे सेवन केले जाते. बाजारात आवळा चूर्ण सहज उपलब्ध होते. केस आणि त्वचेसंबंधित समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी आवळ्याचे सेवन केले जातात. चवीला तुरट असलेले आवळा अनेक आजारांवर गुणकारी आहे. आवळ्यामध्ये विटामिन सी, अँटीऑक्सिडंट्स, फायबर आणि अनेक आवश्यक पोषक घटक आढळतात जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. पण बाजारात मिळणारी आवळा पावडर विकत आणण्यापेक्षा घरी बनवलेली आवळा पावडर आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. आवळा पावडर किंवा चूर्ण घरी सहज बनवता येते. चला तर जाणून घेऊया आवळा पावडर बनवण्याची सोपी रेसिपी.



साहित्य:

१० आवळे

कृती:

आवळा पावडर बनवण्यासाठी सर्वप्रथम आवळे स्वच्छ धुवून सुकवून घ्या. आवळे पूर्ण सुकल्यानंतर त्यांचे बारीक बारीक तुकडे करून घ्या. त्यानंतर मिक्सरच्या भांड्यात टाकून बारीक चुरा करून घ्या. यामध्ये पाणी घालू नये. तयार केलेली आवळ्याचा चुरा कॉटनच्या कपड्यात घेऊन त्यातील पाणी संपूर्ण नितळून घ्या. आवळ्यामध्ये जराही पाणी ठेवू नये.

आवळ्यातील पाणी काढून झाल्यानंतर ताटात आवळ्याची पावडर ठेवून उन्हामध्ये सुकवण्यासाठी ठेवा. आवळ्याची पावडर व्यवस्थित सुकल्यानंतर मिक्सरच्या भांड्यातून पुन्हा एकदा फिरवून घ्या. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेली आवळा पावडर.

आवळ्याचे चूर्ण तयार करण्याची कृती:

आवळा चूर्ण तयार करण्यासाठी मिक्सरच्या भांड्यात आवळा पावडर घेऊन त्यात गुळाचा पाक, मीठ, काळं मीठ, सुंठ आणि जिरे पावडर टाकून व्यवस्थित बारीक पावडर तयार करा. तयार केलेली पावडर तुम्ही सकाळी उठल्यानंतर किंवा इतर वेळी पिऊ शकता. या पावडरचे सेवन केल्यामुळे पचनासंबंधित समस्या दूर होतील.

## भ्रष्ट महायुती सरकारची बिघडलेली डीपी काढा अन् हातावर शिक्का मारा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे आवाहन

### रेणापूर तालुक्यातील आरजखेडा, दर्जी बोरगाव येथे प्रचार सभेस मोठा प्रतिसाद



लातूर / रेणापूर :- राज्यांतील सत्तेवर असलेल्या महायुती सरकारने गेल्या अडीच वर्षात सर्वच समाजाला झुलत ठेवण्याचं काम केले आहे एवढ्यावर न थांबतात लोकांचे घरे फोडली असून आता सरकारचा निर्णय जनता आदालती मध्ये आहे त्यामुळें असंवेदनशील सरकारला सत्तेवरून खाली खेचण्यासाठी हाताच्या पंजाच्या समोर बटन दाबा सरकारचा डिपी उडेल असा घणाघात राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी बोलताना व्यक्त केले ते रेनापुर तालुक्यातील आराजखेडा येथे शुक्रवारी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्या प्रचारार्थ मतदाराशी संवाद बैठकीत बोलत होते यावेळी माजी आमदार त्रंबक भिसे, साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील, रेणा साखर कारखान्याचे माजी चेअरमन यशवंतराव पाटील रेणाचे चेअरमन सर्जे राव मोरे, जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष प्रमोद जाधव सुरेश लहाने बाजार समितीचे उपसभापती शेषराव हकीम लालासाहेब चव्हाण उमाकांत खलंगरे ,आशाताई भिसे,हरिराम कुलकर्णी, बाजार समितीचे संचालक प्रकाश सूर्यवंशी, किशोर सूर्यवंशी रमेश सोनवणे, राजकुमार सूर्यवंशी, परमेश्वर सूर्यवंशी चंद्रकांत पाटील, महादेव पाटील गोपाळ भोसले वामन पाटील एडवोकेट रमेश पाटील सुग्रीव मुंडे चंद्रकांत पाटील हणमंत पवार पपू स्वामी,प्रभाकर केंद्रे माणिक सूर्यवंशी तानाजी सुर्यवंशी बाळकृष्ण माने,आदी मान्यवर उपस्थित होते

बहिणीची काळजी दाजी बेजार

दिलीपराव देशमुख यांचा सरकारवर हल्लाबोल

राज्यातील महायुती सरकारने लाडक्या बहिणीसाठी पंधराशे रुपये दिले पण दाजीला अडचणीत टाकलेले आहे अशी खरमरीत टीका करत आमचे महायुती सरकार सत्तेवर आल्यास लाडक्या बहिणींना तीन हजार रुपये देवुन त्यांचा सन्मान करणार असून एक महिन्यात सरकार आल्यावर सर्व भाव स्थिर करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले त्यासाठी आपण सर्वांनी येत्या २० नोव्हेंबर रोजी काँग्रेसचे उमेदवार धीरज देशमुख यांना अधिक मताधिक्य द्यावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले

आरजखेडा दर्जी बोरगाव गव्हाण दिलीपराव देशमुख यांचे स्वागत

राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचे आरज खेडा, दर्जी बोरगाव गव्हाण गावात आगमन होताच ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर स्वागत केले महिलांनी औक्षण केले धीरज देशमुख यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असा शब्द यावेळी महिला भगिनींनी दिला तर ग्रामस्थांनी अधिक मताधिक्य देणार असल्याचे सांगून धीरज देशमुख मोठया मताधिक्याने विजयी होतील असा विश्वास व्यक्त केला

## आमदार झाल्यावर पत्रकारांना विसरू नका!मंत्रालय मुख्य संपर्कप्रमुख नितीन जाधव व अल्ताफ पिरजादे . राज्य पत्रकार संघाच्या विविध मागण्यांचे निवेदन पुणे शहरातील विविध पक्षाच्या लोकप्रतिनिधींना सुपूर्त..




पुणे / प्रतिनिधी :- आमदार झाल्यावर पत्रकारांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करू नका पत्रकारांना विसरू नका अशी मागणी मंत्रालय मुख्य संपर्कप्रमुख नितीन जाधव व अल्ताफ पिरजादे यांनी भेटीदरम्यान केली. पुणे शहरातील विविध पक्षाच्या भावी लोकप्रतिनिधींना पत्रकारांच्या मागण्यांचे निवेदन दिले . आम्ही आपल्या सोबत आहोत मागण्याचा पाठपुरावा करू असे आश्वासन संघटनेच्या शिष्टमंडळास दिले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मंत्रालय मुख्य संपर्कप्रमुख तथा राजकीय सल्लागार नितीन जाधव तसेच पत्रकार संघाचे पश्चिम महाराष्ट्राचे उपाध्यक्ष अल्ताफ भाई पिरजादे यांनी पुणे शहरातील उमेदवारांच्या भेटी घेऊन सविस्तर मागण्यांचे निवेदन सुपूर्त केले व विधानसभेत आपण पत्रकारांच्या प्रश्नावर आवाज उठवावा असे सांगितले. राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतरावजी मुंडे व प्रदेश सरचिटणीस विश्वासरावजी आरोटे. प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव यांनी राज्यभर विविध लोकप्रतिनिधींना आपले मागण्यांचे निवेदन देण्याचा उपक्रम सुरू ठेवला आहे त्याचाच एक भाग म्हणून पुणे शहरांमध्ये सदरचा उपक्रम राबवण्यात आला. यास उत्तम प्रतिसाद मिळाला.

सदरच्या भेटीमध्ये भाजपचे राष्ट्रीय महासचिव विनोदजी तावडे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली व त्यांना पत्रकारांच्या अडचणी व विविध मागण्या मंजूर करणे बाबत निवेदन दिले यावेळी त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला तसेच महायुती सरकारने पत्रकार महामंडळ मंजूर केल्याबद्दल त्यांचे धन्यवाद मानले. तसेच माजी गृहराज्यमंत्री काँग्रेसचे नेते पुणे कॅन्टोन्मेंट मतदार संघाचे उमेदवार रमेश बागवे यांना समक्ष भेटून सदरच्या मागण्यांचे निवेदन दिले. हडपसर मतदार संघाचे मनसे चे उमेदवार साईनाथ बाबर यांनाही निवेदन देण्यात आले. त्याचबरोबर शिवाजीनगर मतदार संघाचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांना निवेदन दिले व चर्चा केली.

सदरच्या मागण्यांमध्ये पत्रकारांना मंत्रालय परिसरामध्ये निवासाची सोय व्हावी. पत्रकार महामंडळ त्वरित कार्यान्वित व्हावे. युट्युब, वेब पोर्टल डिजिटल चैनल पत्रकारांना अधिकृत नोंद मिळून वार्ताहर दर्जा मिळावा. पार्किंग व टोल शुल्क माफ व्हावे. अभ्यासू पत्रकारांना तालुका व जिल्हा कमिटी वरती नियुक्ती मिळावी. यासह विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

## हळूहळू लिव्हर पोखरतायत हे ४ ड्रिंक्स, तुम्ही तर पित नाही ना? वेळीच व्हा सावध गमवाल जीव

तुमच्या आवडत्या पेयाचा आस्वाद घेणे चांगले वाटते, पण तुम्हाला माहीत आहे का की तुमची ही सवय तुमच्या लिव्हरला हळूहळू हानी पोहोचवू शकते? होय, तुम्ही ते बरोबर वाचले! अशी काही पेये आहेत जी तुमच्या यकृतासाठी अत्यंत हानिकारक असू शकतात आणि कालांतराने यकृताचे आजार होऊ शकतात आणि तुमच्या लिव्हरला धोका पोहचवात. यामुळे फॅटी लिव्हर होऊ शकते वा लिव्हर निकामी होऊ शकते.

लिव्हर हा आपल्या शरीराचा एक महत्त्वाचा अवयव आहे, जो शरीरात जमा झालेला कचरा फिल्टर करण्यासाठी, तसंच शरीरातील चरबीचे चयापचय करण्यासाठी आणि पचन चांगले ठेवण्यासाठी सतत कार्य करतो. परंतु आपल्या काही सामान्य पेयांच्या सेवनाने यकृत हळूहळू कमकुवत होऊ शकते. चला जाणून घेऊया ती ४ पेये, ज्यांचे जास्त सेवन केल्याने यकृताला गंभीर नुकसान होऊ शकते.

सोडा सोडा हे फक्त गोड पेय नाही, तर त्यात असलेली अतिरिक्त साखर आणि कृत्रिम घटक यकृतावर खोलवर परिणाम करतात. कॅनेडियन जर्नल ऑफ गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी आणि हेपॅटोलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, सॉफ्ट ड्रिंक नियमितपणे पिण्याने यकृतामध्ये अधिक चरबी घुसण्याचा धोका वाढतो. या स्थितीला नॉन-अल्कोहोलिक फॅटी लिव्हर डिसीज (छ-ऋडऊ) म्हणतात, ज्यामध्ये यकृतामध्ये चरबी जमा होते, ज्यामुळे यकृतामध्ये जळजळ आणि अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात.

एनर्जी ड्रिंक्स बरेच लोक एनर्जी ड्रिंक्सचे सेवन करतात, परंतु यामुळे तुमच्या यकृताला खूप नुकसान होऊ शकते. यूएस नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिसिनच्या अभ्यासानुसार, जास्त एनर्जी ड्रिंक प्यायल्याने यकृताला गंभीर इजा होऊ शकते. या पेयांमध्ये मोठ्या प्रमाणात टॉरिन, कॅफीन आणि इतर उत्तेजक घटक यकृतावर अतिरिक्त ताण देतात, ज्यामुळे दीर्घकाळात यकृताचे नुकसान होऊ शकते आणि काही प्रकरणांमध्ये लिव्हरचे प्रत्यारोपण होऊ शकते. दारू अल्कोहोलचे जास्त सेवन लिव्हरला हानी पोहोचवते हे जवळपास सर्वांनाच माहीत आहे. जॉन्स हॉपकिन्स मेडिसिनच्या मते, अल्कोहोलिक यकृताचा आजार जास्त प्रमाणात मद्यपान केल्याने होतो, ज्यामुळे जळजळ, डाग पडणे आणि शेवटी लिव्हर निकामी होऊ शकते. दारूचे हे परिणाम खरं तर सर्वांनाच माहीत आहेत मात्र तरीही अनेकजण याच्या आहारी जातात

शुगर लोडेड ड्रिंक्स फ्लेवर्ड चहा, फ्रूट पंच आणि इतर साखरयुक्त पेयांमध्ये साखरेचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे यकृतावर अधिक ताण येतो. ही साखर यकृतामध्ये चरबीच्या रूपात साठवली जाते, ज्यामुळे चा धोका वाढतो.

# लातुरला पहिली महिला आमदार मिळावी ही तर महिला डॉक्टरांची इच्छा!

**एकच गर्जना,पाटील अर्चना**

यावेळी सर्व महिला डॉक्टरांनी डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या समवेत सेल्फी घेण्यासाठी त्यांना गराडा घातला. महिला डॉक्टरांनी घोषणाही दिल्या. एकच गर्जना,आमदार होणार डॉक्टर अर्चना, काय म्हणता लातूरकर ? आता डॉक्टर अर्चना पाटील चाकूरकर या घोषणांनी कस्तुरी मंगल कार्यालय दणाणून सोडले.

लातूर/प्रतिनिधी:देशाला डॉक्टरांचा पुरवठा करणारी खाण,लातूर पॅटर्न अशी ओळख प्रस्थापित करणाऱ्या लातूर शहर मतदारसंघाला पहिली महिला आमदार मिळावी अशी इच्छा शहरातील सर्व प्रथितयश महिला डॉक्टरांनी व्यक्त केली.डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या रूपाने ही इच्छा पूर्णत्वाकडे जाणार असून त्यासाठी सारी डॉक्टर मंडळी कामाला लागली असल्याचे चित्र शुक्रवारी दिसून आले.

लातूर शहर मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कस्तुराई मंगल कार्यालयात शहरातील महिला डॉक्टरांची संवाद बैठक संपन्न झाली. भाजपा महिला मोर्चाच्या अध्यक्षा रागिनीताई यादव यांच्यासह शहरातील प्रख्यात डेंटिस्ट डॉ.पुष्पलता सोमाणी, रेडिओलॉजिस्ट डॉ.अरुणा देवधर,आयुर्वेद तज्ञ डॉ. आरती संधीकर,होमिओपॅथी प्रॅक्टिस करणाऱ्या डॉ.अर्चना आपटे,डॉ.ऋजुता अयाचित यांच्यासह शहरातील मान्यवर महिला डॉक्टर या बैठकीस उपस्थित होत्या.

डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी स्वतः ला रुग्णसेवेत झोकून देत मोठे काम उभे केले आहे. एक डॉक्टर आमदार असेल तर मतदार संघातील नागरिकांच्या आरोग्याची काळजीच राहणार नाही. त्यामुळे अर्चनाताईंना निवडून देण्याचा निर्धार या बैठकीत सर्व डॉक्टरांनी केला. वैद्यकीय व्यवसाय करताना विविध अडचणी येतात,त्यांची वेळीच सोडवणूक व्हावी.शहरात ८ दिवसानंतर पिण्याचे पाणी मिळते,ही अडचण दूर करावी. शहरातील रस्ते चांगले व्हावेत. जातीपातीचे राजकारण थांबवावे,अशी अपेक्षा यावेळी डॉक्टरांनी व्यक्त केली.

लातूर शहर मतदारसंघात आता परिवर्तनाची लाट आली आहे.अर्चनाताईंच्या रूपाने विकासाची दृष्टी असणारे नेतृत्व आपल्याला लाभणार आहे.बदल करण्याची हीच संधी असून या संधीचे सोने करावे,असे आवाहन डॉक्टरांच्या वतीने यावेळी करण्यात आले.

यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, कोणाच्याही दबावाला बळी न पडता ही बैठक पार पडली याचा मनस्वी आनंद मला होत आहे. लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी लोकप्रतिनिधीकडे इच्छाशक्ती असावी लागते.त्याला मानसिकतेची जोड हवी असते. पण



लातूरच्या लोकप्रतिनिधींकडे नेमका याचाच अभाव आहे. वैद्यकीय सेवा देणाऱ्यांनाही लातुरात सुविधा मिळत नाहीत. पण आता तसे होणार नाही. रुग्णसेवा करणाऱ्यांना अडचण होणार नाही,असा शब्द डॉ. अर्चनाताई पाटील यांनी दिला.

डॉक्टरांच्या आयएमए हॉल साठी अनेक वेळा आश्वासने दिली गेली पण अजूनही त्याचे काम झाले नाही.आपण संधी देत मला विजय केले तर पुढची बैठक आयएमए हॉलच्या भूमिपूजन सोहळ्यातच होईल, असे ताईंनी म्हणताच टाळ्यांचा कडकडाट झाला.

कोविडच्या संकटात आपले आमदार विदेशात जाऊन बसले होते.मी मात्र उदगीर येथे रुग्णसेवेत व्यस्त होते.त्या काळात माझ्या रुग्णालयाला ऑक्सिजन मिळू नये यासाठी त्यांनी प्रयत्न केले. ही मानसिकता योग्य नव्हती,असे ताई म्हणाल्या.

डॉ.अर्चनाताई पाटील म्हणाल्या की,शहरात पाणी, कचरा या मूलभूत समस्या आहेत.त्या समस्या सोडविण्यासाठी काम करण्याची गरज आहे. चाकूरकरांच्या रक्तात लोकसेवेचा डीएनए आहे.जात–पात न मानता सर्वसमावेशक विकास करणे हाच माझा ध्यास आहे.माझ्याकडे हरण्यासाठी काही नाही,मी जिंकणारच आहे. आपले प्रेम व विश्वास तुटू देणार नाही.इथून पुढचे जीवन जनतेसाठी समर्पित आहे,असेही डॉ.अर्चनाताई पाटील म्हणाल्या.

प्रस्थापितांची दहशत मोडून आपण या बैठकीस उपस्थित राहिलात त्याचा मनस्वी आनंद झाल्याचेही डॉ.अर्चनाताई पाटील म्हणाल्या.

बैठकीचे सूत्रसंचलन डॉ. ऋजुता अयाचित तर आभार प्रदर्शन रागिनीताई यादव यांनी केले.राष्ट्रगीताने कार्यक्रमाची बैठकीची सांगता झाली.या बैठकीस शहरातील बहुतांश महिला डॉक्टरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मुख्य रस्त्यांनी उदगीर शहराला जोडून दळणवळणाची व्यवस्था मजबुत केली : ना संजय बनसोडे

यावेळी बोलताना माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे यांनी डॅम रोडचा भाग हा भाजपाचा बालेकिल्ला आहे. या भागातून ना. बनसोडे यांना सर्वाधिक मताधिक्य देणार असा विश्वास व्यक्त करून गेल्या निवडणुकीत निवडून आल्यापासून ना. बनसोडे यांनी कामाचा धडाका चालू ठेवला. २४ तास जनतेसाठी सेवा करणारा नेता म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली. कोरोना काळात स्वतःला दोनदा कोरोना होऊन देखील या भागातील जनतेला आरोग्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी मोठी धडपड केली होती, असे सांगून सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी सदैव धडपडत राहणाऱ्या अशा नेतृत्वाला जपण्याचे काम मतदारांनी करावे असे आवाहन बागबंदे यांनी केले. महायुतीच्या सरकारने महिलांच्या सन्मानासाठी अनेक कामे केली आहेत उज्वला गॅस योजना, घरकुल योजना, आनंदाचा शिधा अशा अनेक महत्वपूर्ण योजना राबवित असतानाच आपल्या नावापुढे आईचे नाव लावण्याचा कायदा केला असून आगामी काळात ३३ टक्के आरक्षण महिलांना देण्यात येणार आहे. अशा महिलांच्या सन्मान करणाऱ्या महायुतीला पुन्हा एकदा सत्तेवर आणण्याचे आवाहनही यावेळी बस्वराज बागबंदे यांनी केले.

उदगीर / प्रतिनिधी :– कुठल्याही शहराचा विकास हा तेथील दळणवळणाच्या सुविधेवर अवलंबून असतो, उदगीरला विकसित शहर म्हणून उदयास आणण्यासाठी आपण या शहराच्या चारही बाजूचे रस्ते दर्जेदार करून आजूबाजूच्या शहराशी जोडून दळणवळणाची व्यवस्था मजबूत करण्याचे काम मागील पाच वर्षांच्या काळात केले असल्याचे प्रतिपादन राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी केले.

उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार मंत्री संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ डॅम रोड परिसरात प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंत्री बनसोडे बोलत होते.

यावेळी माजी आमदार गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटूरे, बस्वराज बागबंदे, उषा कांबळे, रामराव बिरादार येनकीकर, समीर शेख,भाजपचे शहराध्यक्ष मनोज पुदाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, बस्वराज पाटील कोळखेडकर, डॉ. प्रकाश येरमे, सुदर्शन मुंडे, उत्तरा कलबुर्गे, बालाजी भोसले, अनिल मुदाळे, विजय निटूरे, सुधीर भोसले, साईनाथ चिमेगावे, संदीप देशमुख, अमोल अनकल्ले, अरुणा चिमेगावे,ॲड. वर्षा कांबळे, दीपाली औटे, प्रकाश राठोड, सावन पस्तापुरे, गणेश गायकवाड आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना मंत्री बनसोडे म्हणाले की,



आज घडीला उदगीर शहरात वाहतुकीचा त्रास होत

आहे. हा त्रास कमी करण्यासाठी शहराच्या बाजूने गेलेल्या वळण रस्त्याचे काम आगामी काळात पूर्ण करण्याचा माझा संकल्प आहे. मलकापूर परिसरातील पुलाचे काम लवकरच पूर्ण होत असून त्यामुळे शहराची वाहतूक सुरळीत होणार आहे. डॅम रोड वरील नागरिकांनाही रेल्वे गेट मुळे होणारा त्रासही आगामी काळात होणार नाही यासाठी उड्डाण पूल तयार करण्यात येणार असल्याचे मंत्री बनसोडे म्हणाले. गेली पाच वर्षे मी आमदार व मंत्री म्हणून या भागाची प्रामाणिकपणे सेवा केली आहे. आगामी काळातही ही सेवा अशीच चालू ठेवण्यासाठी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदारांनी आशीर्वाद देऊन आपल्याला निवडुन द्यावे असे आवाहन मंत्री बनसोडे यांनी यावेळी केले.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात पंडीत नेहरु व क्रांतीवीर लहुजी साळवे यांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधून ग्रंथवाचन व पेपरवाचन करून संपन्न

केज/ प्रतिनिधी स्वानंद सार्वजनिक वालनालय, आनंदगांव ता. केज.जि. बीड येथे दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान, थोर स्वातंत्र्य सेनानी पंडित जवाहरलाल नेहरू व क्रांतीवीर लहुजी साळवे यांची संयुक्त जयंतीचे औचित्य साधून ग्रंथवाचन व दैनिके वाचन त्यानंतर रमेश गायकवाड, माजी सरपंच रामराजे गायकवाड, नारायण भोगजकर, नारायण गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, दादासाहेब गायकवाड, आनंद गायकवाड, आरुण गायकवाड, रंजीत पाटील, सतीश जोगदंड, बबन पुंड यांनी वर्तमान पत्रांचे वाचन केले.




करून साधेपनाने साजरी करण्यात आली. सर्वप्रथम पंडीत जवाहरलाल नेहरू व लहूजी साळवे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून पुजन वं वंदन करण्यात आले त्यानंतर ।। बातवाच कांचे ।। बालवाचन घेण्यात आले. ज्ञानेश्वरी पुंड,श्रीकृष्ण गिरी, श्रुती पुंड यांनी ग्रंथवाचन केले. अध्यक्षीय समारोप ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, मजी प्राचार्य, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, ख्यातनाम वक्ते, व्याख्याते वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचलन, आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी केले.

# हारुणभाई इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(ए) यांचा पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा पृथ्वीराज साठे यांच्या विजयासाठी हारुणभाई इनामदार यांनी उचलला विडा

केज/प्रतिनिधी हारुणभाई इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(ए) यांचा पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षाचे तथा महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांच्या विजयासाठी हारुणभाई इनामदार यांनी विडा उचलला असून जनविकास परिवर्तन आघाडीचे ज्येष्ठ नेते, नगराध्यक्षा, नगरसेवक व कार्यकर्ते पृथ्वीराज साठे यांना विजयी करण्यासाठी महाविकास आघाडीच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. हारुणभाई इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली व संदिपान तात्या हजारे व सुनील हिरवे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया ए केज तालुका यांच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यामध्ये एक मताने ठराव घेऊन महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना हारुणभाई इनामदार यांच्या नेतृत्वाखाली जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना हारुणभाई म्हणाले की, आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील हे मराठा समाजासह मुस्लिम,दलित,ओबीसी समाज बांधवांसाठी लढत आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारीची मागणी करणाऱ्या सर्वांनी स्वतःचे अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेऊन केज मतदार संघाचा विकास व्हावा या हेतूने पृथ्वीराज साठे यांना पाठिंबा दिला आहे. बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बप्पा सोनवणे यांनी सर्व इच्छुक अपक्ष उमेदवारांना एकत्रित करून पृथ्वीराज साठे यांना निवडून आणण्यासाठी अहोरात्र काम करत आहेत. बजरंग बप्पा सोनवणे यांच्या विनंतीला मान देऊन आम्ही



आमच्या जनविकास परिवर्तन आघाडीचा पाठिंबा दिला आहे. पुढे बोलताना इनामदार म्हणाले की,पृथ्वीराज साठे हे एका गरीब कुटुंबातून आल्यामुळे त्यांना गरीब जनतेच्या प्रश्नांची जाण आहे अशा जाण असणाऱ्या पृथ्वीराज साठे यांनाच येणाऱ्या २० तारखेला भरभरून मतदान करून त्यांना निवडून द्यायचे आहे असे उपस्थित नागरिकांना त्यांनी आवाहन केले आहे. आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सकल मराठा समाजासह दलित,मुस्लिम ओबीसी यांच्यासाठी एक मोठा लढा उभा करून स्वतःच्या जीवाची परवा न करता अनेक वेळा उपोषण केले परंतु विद्यमान आमदार यांनी या लढ्याला पाठिंबा दिला नाही. यावेळी नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड बोलताना म्हणाले की, केज मतदार संघामध्ये अनेक महिलावर गुन्हे घडले मोठ्या मोठ्या घटना घडल्या परंतु विद्यमान आमदार या महिला असून देखील त्यांनी त्या घटना घडलेल्या कुटुंबाला कधी भेट दिली नाही अथवा त्यांच्या प्रश्नावर आवाज उठविला नाही त्यामुळे आपल्या महिलांच्या मुलांच्या व शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आवाज उठवण्यासाठी पृथ्वीराज साठे यांना भरघोस मताने निवडून द्यायचे आहे कुणाच्या भुल थापाला व अमिषाला बळी न पडता एक निष्ठेने एकाग्रतेने सर्वांनी मिळून साठे साहेबांना निवडून आणण्यासाठी काम करायचे आहे. यावेळी संदिपान तात्या हजारे म्हणाले की,आमचा पक्ष हा महायुतीतील घटक पक्ष आहे परंतु विद्यमान आमदार व त्यांच्या कुटुंबाला दलितांची एलर्जी आहे. त्यांना दलित समाजाची मते जमतात परंतु दलितांचा विकास करायला जमत नाही आणि दलित समाजाला भेटायला त्यांना वेळ देखील भेटत नाही असे बोलताना संदिपान तात्या यांनी स्पष्ट केले आहे. हारुणभाई इनामदार यांनी केज मतदार संघातील सर्व दलित चळवळीतील पक्ष व संघटना एकत्रित कले त्या सोबतच मराठा मुस्लिम,साळी,माळी, कोळी या समाजासह आठरा पगड जातीच्या समाज बांधवांना एकत्रित करून पृथ्वीराज साठे यांना विजयी करण्यासाठी त्यांनी विडा उचलला आहे. हारुणभाई इनामदार हे गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून समाजकारण व राजकारणामध्ये सक्रिय आहेत इनामदार हे ज्या पक्षाकडे असतात त्याच पक्षाच्या उमेदवाराला गुलाल लागलेला आहे आज पर्यंतचे रेकॉर्ड असल्याचे नागरिकांतून बोलले जात आहे. यावेळेस रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया केज तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते आणि जन विकास परिवर्तन आघाडीचे नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जरांगेंची तब्येत अचानक बिघडली

जालना : मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांची तब्येत पुन्हा एकदा बिघडली आहे. जरांगे पाटील यांना काल रात्रीपासून ताप, खोकला आणि सर्दीचा त्रास सुरू झाला आहे.

जरांगे यांच्यावर अंतरवाली सराटीमध्येच उपचार सुरू करण्यात आले आहेत. काल रात्री त्यांना ताप आला, त्यानंतर त्यांना खोकला आणि सर्दीचा त्रास देखील सुरू झाला. त्यामुळे त्यांच्यावर आता अंतरवाली सराटीमध्ये उपचार सुरू आहेत.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी मोठा लढा उभारला. त्यांच्या आंदोलनानंतर सरकारने मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षण मंजूर केले, मात्र मनोज जरांगे अजूनही मराठा समाजाला ओबीसीमधूनच आरक्षण मिळावे या आपल्या मागणीवर ठाम आहेत. त्यासाठी त्यांनी विधानसभा निवडणुकीत उतरण्याचा निर्णय देखील घेतला.

विधानसभेसाठी त्यांनी मराठा, दलित आणि मुस्लिम समाजाची मोट बांधण्याचा प्रयत्न केला. जीथे उमेदवार निवडून येण्याची शक्यता आहे, तीथे उमेदवार देऊ, जिथे शक्यता नाही तीथे आमच्या मागण्यांचे जो समर्थन करेल त्या उमेदवाराला पाठिंबा देऊ अशी त्यांची भूमिका होती. मात्र त्यांनी ऐनवेळी निवडणुकीतून माघार घेतली.

त्यानंतर आता त्यांनी आपली पुढची दिशा स्पष्ट केली आहे. मराठा समाज सुज्ञ आहे, त्यांना फार काही सांगण्याची गरज नाही. मी कोणत्याही पक्षाला पाठिंबा दिला नाही, त्यामुळे मराठा समाजाला वाटेल त्या उमेदवाराला ते पाडतील ज्याला निवडून आणायचे आहे त्याला निवडून आणतील.

# केज तालुक्यातील कुंबेफळ येथील नागरिकांचा मतदानावर बहिष्कार

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील कुंबेफळ येथील शेतकरी कुटुंबाचा विधानसभा,जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या मतदानावर सामूहिक बहिष्कार. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, कुंबेफळ येथील शेतकरी बांधवांना कुंबेफळ ते जवळबन रस्त्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून सतत शासन स्तरावर पाठपुरावा करून देखील अद्यापही रस्त्याचा प्रश्न मार्गी लागला नाही. मागील वीस वर्षापासून २०० ते ३०० शेतकरी या रस्त्यावरूनच जात असताना वागण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे तरी सर्वे नंबर ५३ व ५५ मध्ये दोन ते तीन शेतकरी यांनी सदरील शेतातील जाणारा रस्ता अडवला आहे व रस्त्यावरून वागत असलेल्या लोकांना त्रास देतात गेल्या २० वर्षापासून आपल्या कार्यालया निवेदना उपोषण करून सुद्धा कोणताही निर्णय घेतला नाही यामुळे आता होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीसह जिल्हा परिषद पंचायत समितीच्या होणाऱ्या निवडणुका या निवडणुकीमध्ये मतदान न करण्याचा निर्णय आम्ही सर्व शेतकरी व ग्रामस्थांनी घेतला आहे. सध्या होऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत मतदानावर बहिष्कार टाकत असल्याच्या अनुषंगाचे लेखी निवेदन शेतकरी




व ग्रामस्थांनी तहसीलदार क केज यांना दिले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी व प्रशासन कुंभेफळ येथील शेतकरी व ग्रामस्थांना काय न्याय देऊन मतदानाच्या बहिष्कारपासून परावृत्त करणार याकडे केज तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE